Vol 3 Issue 4 Oct 2013

Impact Factor : 1.2018 (GISI)

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-4, Oct-2013
ISSN 2231-5063
Available online at www.aygrt.isrj.net

# 'जातक'– सांस्कृतिक अतिकमण की बौध्दिकरण?

**नभा काकडे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख सोशल महाविद्यालय, सोलापूर.

***सारांश :***बौध्द साहित्याचा किंबहुना अधिक अचूक सांगायचे आणि मान्य करायचे झाले तर भगवान बुध्दाच्या जीवनाचा अभ्यास अधिक विचक्षणपणे करायचा झाला तर खुद्दकनिहाय मध्ये सामाजिक असणा–या जातक कथांचा अभ्यास आवश्यकच नाही तर अपरिहार्य ठरतो. आज बौध्द साहित्याचा भाग असणा–या जातक कथांचे स्वरूप, त्याची मांडणी त्यात सांगीतल्या गेलेल्या कथा वस्तू यांचा मीमांसकवृत्तीने अभ्यास नितांत आवश्यक आहे. श्रध्दा आणि भक्ती यांचे आवरण चढविल्या नंतर ही बाब परिक्षण परिघाच्या बाहेरच राहाते आणि म्हणून तिच्या मूळ स्वरूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न देखील खुरा आणि दुर्बल ठरतो. अभ्यासकाच्या दृष्टिने अत्यंत आक्षेपार्ह ठरणारा हा मुद्दा बाजूस ठेवून जातक कथांचे परिक्षण करण्याचा प्रयत्न करणे वावगे होणारे नाही. एखाद्या बाबीशी संबंधित असणारी श्रध्दा ही परिक्षण आणि विश्लेषण यासाठी अडसर निर्माण करते हे मान्य करूनही कोणताही धर्म हा मानवाला केंद्रस्थानी ठेवून निर्माण झालेला असल्याने, त्याच्याशी ससंबंधित असणा–या साहित्यात मानवाचे हित वा अहित यांना साध्य करण्यासाठी कितपत परिणामकारक पध्दतीने उपाय सांगितला आहे हे पाहणे चूक ठरणारे नाही विपरित ते न्यायोवितच असते. जातककथांचा विचार या मानदंडांना प्रमाण मानूनच करायला हवा!

***प्रस्तवाना :***

जतक कथांचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट सहजपणे लक्षांत येते की सर्व जातक कथांतून कर्मवादाचे नीतितत्व अनुस्यूत असते.यामुळे पुनर्जन्मवादही येतो. जातककथांतून येणारा पुनर्जन्म हा बौध्द तत्वज्ञानाच्या अथवा भगवान बुध्दाने प्रतिपादन केलेल्या पुनर्जन्म तत्वाच्या अनुसार आहे असे प्रतिपादन करणे योग्य आहे का ? हा विचार महत्वाचा आहे. भगवान बुध्दाने जो पुनर्जन्म सांगितला आहे तो बौध्दिकांच्या पुनर्जन्म सिध्दांतापेक्षा वेगळा आहे. त्या अनुसार आत्मा या घटकांशिवाय असणा–या अन्य चार घटकांचे पुनर्जन्म होतात असे म्हटले आहे. जातककथा या त्या बोधिसत्वाच्या भोवती फिरतात की जो प्रत्येक जन्मातून एखादा गुण प्राप्त करून स्वतःचे व्यक्तित्व अधिक गुणसंपन्न करीत असतो. पर्यायाने एकाच बोधिसत्वाने अनेकदा जन्म घेऊन स्वतःस गुणसंपन्न करून बुध्द होण्यास पात्र केले असाच संदेश जातक कथातून दिला गेला आहे. प्रत्येक जन्मात केलेल्या विशिश्ट कर्मातून त्याने आपली गुणवृध्दी केलेली असल्याने कर्मसिध्दांताचा आधार प्रत्येक जन्मास स्पश्ष्टपणे नसला तरीही एकाच आत्म्याने पुनर्जन्म घेतला असेच मान्य करायला आज अवघड वाटते खरे, पण विचक्षणपणे विचार करता मान्य होणे कठीण नाही. जातककथांत,

गमयित्वऽ न्यमाक्रममाक्रम्या त्मानुपसंहरती ।।3।।
तद्यथा पेशस्कारी पेशसो मात्रामुपदायान्यन्नवतरं कल्याणतरंरूपं तनुतएवामे
वायमात्मेदं
शरीरं निहत्याऽविद्यां गमतित्वादन्यन्नवतरं कल्याणतरं रूपं कुरूते ।।4।।[1]

ज्याप्रकारे गवतावर राहाणारी अळी पहिल्या गवताच्या काडीच्या अग्रभागावर जाते, तेथे आपला अर्धा भाग पहिल्या काडीवर ठेवून आपल्या शरीराचा पुढील अर्धा भाग दुस–या काडीवर ठेवते. तेथील पुढील आधार पक्का झाल्यावर आपल्या शरीराचा राहिलेला भाग त्या दुस–या काडीवर घेते,याच प्रमाणे हा आत्मा शरीराचा नाश होण्याच्या समयी आशा रीतीने दुस–या देहाचा आश्रय केल्यावर पूर्ण देहावरून स्वतःस काढून घेते ।।3।। जसे चित्रकार चित्र करण्याचे साहित्य घेऊन नवे चित्र तयार करतो याच प्रकारे हा आत्मा या शरीराचा नाश होताच काही अज्ञात रीतीने दुसरे नवे उत्तम शरीर धारण करतो.

महाभारतातही पुनर्जन्माच्या संबंधाने म्हटले आहे की,
यथा हि पुरुषः शालां पुनः संप्रविशेन्नवाम् ।
एवं जीवः शरीराणि तानि तानि प्रपद्यते ।।57।।[2]

जसा मनुष्य नव्या घरात प्रवेश करतो, तसेच जीवात्मा नव्या नव्या शरीरात जातो, जुने देह सोडतो आणि नव्या देहात प्रवेश करतो.
वैदिक ग्रंथातून पुनर्जन्माचे अनेक उल्लेख आढळतात. गीतेतला उल्लेख तर सर्वख्यात आहेच.
पुर्नजन्माच्या सिध्दांतास कर्मविपाक सिध्दांताची जोड दिली गेली. वैदिकोत्तर कालखंडात दिली गेली आणि पुरोहितवर्गाने स्वार्थ साधला. पुरोहितवर्गाच्या या वर्तनास बहुजनवर्ग त्रासला होता. भगवान बुध्दाच्या उदयास अनुकूल अशी पार्श्वभूमी तयार करण्याचे काम पुरोहितशाहीच्या या वर्तनाने केली होती हे निर्विवाद आहे. तरीही पुनर्जन्माच्या सिध्दांताने मानवी मनावर घातलेली मोहिनी ही अजूनही मानवी मनावर कायम असल्याचे अनुभवास येते.

वैदिकांनी मांडलेल्या पुनर्जन्म सिध्दांतामुळे समाज लुबाडला जात होता आणि निर्माण झालेल्या परिस्थितीने भगवान गौतम बुध्दास जन्म दिला हे निर्विवाद सत्य आहे. असे असतांनाही इ.स.पू. च्या दुस–या शतकात निर्माण झालेल्या 'मिलिंदपन्ह' अर्थात 'मिलिंदप्रश्न' या ग्रंथात वैदिकांच्या सिध्दांताच्या अनुसारच पुनर्जन्मा संबंधीचा मजकूर आलेला आहे. हे काहीसे चकित करणारे आहे असे प्रथम वाचनांत वाटण्याची शक्यता आहे. परंतु विचार करता ही सहज घडलेली क्रिया आहे हे लक्षांत येते. या ग्रंथात पुनर्जन्म आणि कर्मसिध्दांताच्या संबंधाने काय प्रतिपादन केले आहे हे पाहाणे रंजक आहे.
त्यात म्हटले आहे,

यानंतर देवांचा राजा सक्क भिक्षुसंघास सामोरे करून केतुमती प्रासादात जाऊन दाखल झाला आणि महासेनास अलिंगन देऊन म्हणाला,
“ हे मारिस, मनुष्यलोकात आपण जन्म घ्यावा, अशी भिक्षुसंघ आपणास प्रार्थना करीत आहे. ”
“ नाही भन्ते, मनुष्य लोकांशी मरण काही कर्तव्य नाही. कामकाजाच्या व्यर्थ रगाडयात भरल्या जाणा–या जीवनास क्षणाची उसंत मिळत नाही. असे त्राही करून सोडणारे मानवी जीवन आहे. तेंव्हा भंते, मी येथे देवलोकातच क्रमशः वरच्या पाय–या गाठून जन्म ग्रहण करीत मुक्तीचे शिखर गाठीन. ”

याप्रमाणे सक्काने तीनदा मनुष्यलोकी जन्म घेण्याची विनंती केली, परंतु तीनही वेळेस महासेनाने वरीलप्रमाणे उत्तर दिले.यावर आयुष्यमान अस्सगुप्त म्हणाले की,
“ हे मारिस, समस्य देवालोकासहित सा–या जगात राजा मिलिंदाच्या तर्काचे सडेतोड उत्तर देऊ शकेल असा आपल्याशिवाय दुस–या कोणी दृष्टीस पडत नाही. तेंव्हा आपणच मनुष्यलोकी जन्म घेऊन दशबल बुध्दाच्या पवित्र शासनाचे रक्षण करावे असे भिक्षुसंघ आपणास विनंती करतो. ”
“ राजा मिलिंदाच्या तर्काला भेदून बुध्द शासनाचे आपण रक्षण करू शकाल हे ऐकून महासेनास अतिशय आनंद झाला आणि असेच आहे तर ठीक आहे मी मनुष्यलोकी जन्म ग्रहण करीन असे अभिवचन दिले. ”[3]

मिलिंद प्रश्न हा ग्रंथ राजा मिलिंद आणि भिक्षू नागसेन यांच्यात झालेल्या संवादाचा आहे. म्हणजेच त्यांच्यात घडलेल्या प्रश्नोत्तराचा आहे. या प्रश्नोत्तराच्या प्रवाहात अनेक अर्थात मानवी जीवनास स्पर्शणा–या सर्व विषयांचा उहापोह झालेला आहे. मिलिंदाने मानवी मनास पडणा–या सर्व प्रश्नांना भिक्षू नागसेनासमोर सादर करून त्याची उत्तरे प्राप्त केली. फक्त प्रश्नोत्तराच्या माध्यमातून ज्ञान प्रकटीकरण करणारा हा तसा एकमेव ग्रंथ असावा. भिक्षु नागसेन हा ज्ञानवंत आचार्य असूनही तो प्रश्नकर्त्या राजा मिलिंदाच्या समकक्ष येऊन

प्रश्नाची उत्तरे देऊन त्याचे समाधान करतो ही बाब तो खरा आचार्य असल्याचे सिध्द करते.

मिलिंदप्रश्न या ग्रंथात प्रारंभीच पुनर्जन्माची कथा मांडल्यानंतर विमतिच्छेदन प्रश्न या प्रकरणांत कर्मविषयक सिध्दांताची चर्चा केलेले आढळते. कर्मविषयक सिध्दांत या शब्दाची येथे जाणिवपूर्वक योजना केली आहे. आणि आलेला संदर्भ पहाता तो चूक आहे असे म्हणता येत नाही. कर्मविषयक हे शब्द वैदिकांच्या कर्मसिध्दांताशी संबंधित आहेत हे निश्चित ! केलेल्या कर्माची फळे कर्त्यास परिस्थितीमुळे जर या जन्मात भोगावी लागली नाही तर पुढचा जन्म त्या कर्माच्या अनुसारच जन्म प्राप्त झाल्यावर भोगावीच लागतात. असा विचार मांडणारा वैदिकाचा कर्मविशयक सिध्दांत आहे. या सिध्दांताचा आधार घेऊनच समाजात आहे रे आणि नाही रे असे दोन वर्ग तयार केले गेले होते. बहुजन आणि शुद्र या विचाराच्या साहाय्याने मानसिक गुलाम करून, पूर्व जन्मात केलेल्या पापामुळे श्रम आणि सेवा हा तुमचा धर्म आहे हे यशस्वीरित्या उच्चवर्णियांनी बिंबवले होते. उच्चवर्णियांनी बहुजन आणि शूद्र यांना पशवूत जीवन जगण्यास बाध्य करण्यासाठी या कर्मविशयक सिध्दांताचा उपयोग केलेला होता. हे लक्षात घेऊनच बुध्दाने जो कम्मनियम प्रतिपादन केला त्याच्या अनुसार कर्मांच्या कर्त्यांस त्याच्या कर्मफलाचा उपभोग याच जन्मात विशिश्ट आणि विविध काळात, विशिष्ट परिणाम व्याप्तीसह उपभोगावा लागतो. अर्थात कर्माची फळे कर्त्यांस वर्तमान आयुष्यातच भोगावी लागतात. त्यासाठी त्याने पुनर्जन्म घेण्याची आवश्यकता नाही आणि कर्मफलांचा परिणाम पुढील जन्मात उपभोगता येत नाही. भगवान बुध्दाने अशा अर्थाचा कम्मनियम सांगण्यामागे, कर्मविशयक सिध्दांतातून आलेली वैचारिक क्रूरता हे कारण होते. असे असतांना बौध्द साहित्याचा भाग म्हणून ओळखल्या जाणा–या मिलिंदप्रश्न या ग्रंथात कर्मविषयक सिध्दांताची मांडणी व्हावी आणि त्याचा पुरस्कारही भिक्षु नागसेनाने करावा हे चकित करणारे आहे.

मिलिंद प्रश्नाच्या विमतिच्छेदन या प्रकरणात राजा मिलिंद आणि भिक्षु नागसेनाचा जो संवाद आहे त्यात कर्मविषयक सिध्दांताची मांडणी आहे. त्यात राजा मिलिंद, म्हणतो भंते, सर्व मनुष्ये सारखेच का होत नाहीत ? कोणी अल्पायुषी तर कोणी दीर्घायुषी, कोणी आजारी आहेत तर कोणी आरोग्य संपन्न, कोणी कुरूप तर कोणी फारच सुंदर, कोणी एकदम प्रभावहिन तर कोणी अत्यंत प्रभावशाली, कोणी दरिद्री तर कोणी खूप श्रीमंत, कोणी हलक्या जातीत जन्मलेले तर कोणी उच्च कुळात जन्मलेले, कोणी मुर्ख तर कोणी अतिशय हुशार असे का व्हावे ?

स्वविद म्हणाले – सर्वच वनस्पती एकसारख्या नाहीत, असे का ?काही आंबट, काही खारट, काही तिखट, काही कडू, काही तुरट आणि काही तर अत्यंत गोड असतात. असे का बरे व्हावे ?

भंते, बीजात भिन्नत्व असल्यामुळे या वनस्पतीच्या चवीत भिन्नत्व दिसून येत असले पाहिजे, असा माझा अंदाज आहे.

महाराज, बरोबर ! तुम्ही सांगितल्या प्रमाणेच मनुष्यमात्रांचे आपापले कर्म वेगवेगळे असल्यामुळेच ते सर्व एकसारखे नाहीत. कोणी अल्पायुषी तर कोणी दीर्घायुषी, कोणी आजारी तर कोणी आरोग्य संपन्न, कोणी कुरूप तर कोणी फारच सुंदर, कोणी एकदम प्रभावहिन तर कोणी अत्यंत प्रभावशाली, कोणी दरिद्री तर कोणी खूप श्रीमंत, कोणी हलक्या जातीत जन्मले तर कोणी उच्च कुळात जन्मलेले, कोणी मूर्ख तर कोणी अतिशय हुशार असे पहाण्यात येतात. महाराज, खुद्द भगवान बुध्दानेच म्हटले आहे की, हे मानव जीव सर्वच आपल्या कर्माचीच फळे भोगत असतात. सर्व जीव आपल्या कर्मफळाचे स्वतः मालक आहेत. आपल्या कर्मानुसारच भिन्न भिन्न योनीत जन्मास येतात. कर्म हेच खरे नातेवाईक आणि कर्म हेच आश्रयस्थान आहेत. कर्मामुळेच मनुष्यमात्रांची अशी विभागणी झालेली आहे.[4]

या उपरोक्त मजकूराशिवाय कर्मफळाच्या अनुसारच मानव विविध योनीत विविध प्रकारचे जन्म घेतो हे समजावून सांगण्यासाठी अन्य उदाहरणे दिलेली आहेत.

मिलिंद प्रश्न या ग्रंथातील उपरोक्त उतारा वाचल्यानंतर बुध्दी गोंधळते असे प्रतिपादन करणे हे अत्यंत सौम्य होईल अशी स्थिती निर्माण होते. महासेनाचा पुनर्जन्माच्या संबंधाने असलेला मजकूर आणि हा उपरोक्त मजकूर हे दोन्हीही भगवान बुध्दाने प्रतिपादलेल्या पुनर्जन्म आणि कम्मनियम या सिध्दांतास पूर्णतः छेद देतात. भगवान बुध्दाने मांडलेले सिध्दांत पूर्णतः नाकारतात असे म्हटले तर आश्चर्य वाटू नये.

मिलिंद प्रश्न या ग्रंथाचा उहापोह हे विषयांतर झाले आहे असे वाटण्याची दाट शक्ता आहे परंतु तसे नाही. वरील उहापोह पुनर्जन्म आणि कर्मविषयक सिध्दांत जो वैदिकांना मान्य आहे, त्याची मांडणी आणि अनुकरण कसे बौध्द ग्रंथ म्हणून ओळखल्या गेलेल्या ग्रंथांत आले आहे आणि ते सहजपणे मान्य कसे झाले आहे याच्या दिशादर्शनार्थ केला आहे. हा उहापोह करण्याचे कारण, ज्या ग्रंथाचा विचार करायचा आहे त्या जातक ग्रंथातही या दोन सिध्दांताचा अवलंब कसा केला गेला आहे हे विषद करणे होय.

प्रारंभीच प्रतिपादन केल्याप्रमाणे जातक कथात कर्मवादाचे नीतिमत्व अनुस्यूत असल्यामुळे पुनर्जन्मवाद देखील आहेच. जातक कथात पुनर्जन्माचे तत्व अनुस्यूत असले तरीही ते मान्य करणे अवघड जाते. याचे कारण या कथातून बोधिसत्वाचा असलेला उल्लेख आणि याच्या रचनेचा काळ हा भगवान बुध्दाच्या महापरिनिर्वाणानंतरचा आहे हे होय. याकारणे भगवान बुध्दाने आत्मा ही संकल्पना नाकारलेली असल्याने बोधिसत्वाचा आत्मा प्रत्येक जन्मात विकसित अवस्था प्राप्त करून पुनश्च विकासासाठी जन्म घेतो हे मान्य करायचे का ? भगवान बुध्दाने अनात्मवाद स्वीकारलेला असल्याने पुनर्जन्म झाला तरी फक्त चारच घटकांचा पुनर्जन्म होतो असे मानले जाते. जातक कथेतील पुनर्जन्माच्या संदर्भात भदन्त आनंद कौसल्यायन यांनी म्हटले आहे की विकासवा के अनुसार एक फूल को विकसित होने के लिए, उस पुष्प की जाति विशेष के अस्तित्व मे आने में लाखों वर्ष लग जाते है । तब क्या कोई भी प्राणी साठ या सत्तर अधिक से अधिक सौ वर्ष के जीवन में बुध्द बन सकता है ?उसे इस उद्देश की पूर्ति के लिए अनेक जन्म धारण करने ही होंगे, गौतम बुध्द को भी धारण करने पडे. बुध्द होने के पूर्व अपने सब पिछले जन्मों तथा अंतिम जन्म में उसकी संज्ञा बोधिसत्व रही ।[5]

हे तेव्हा मान्य करणे शक्य होते जेव्हा बुध्द आणि बोधिसत्व यांच्यात भेद आहे हे मान्य होईल. बुध्दत्व ही बोधिसत्वाची विकसित अवस्था आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक पंकळीचा विकास झाल्यानंतरच फुल विकसित होते आणि फूल पूर्णपणे विकसित झाल्यावर ते देहापासून आपोआपच, स्वाभाविकतः गळून पडते त्याचप्रमाणे बुध्दत्व हे बोधिसत्वाने जन्म घेऊन स्वयंविकास साधल्यानंतरच प्राप्त झाले. याकारणे स्वाभाविकपणे भगवान बुध्द हे अनात्मवाद स्वीकारून शरीराच्या चार भौतिक घटकांचा पुनर्जन्म होतो असा सिध्दांत मांडू शकले. बुध्दत्व प्राप्तीसाठी बोधिसत्वास पुनर्जन्म घ्यावे लागले याचे उपरोक्ष मांडणी धम्मपद या ग्रंथातही आढळते असे यात म्हटले आहे.

अनेक जाति संसार सन्धाविस्सं अनिब्बिसं ।
गहकारकं गवेसन्तो दुक्खा जाति पुनजुनं
अर्थात घर करण्याचा शोध करीत असता अनेक जन्मींच्या संसारात तो न सापडता धावत राहिलो. पुनः पुनः जन्म दुःखकारक झाले.[6]

या उपरोक्त गाथेतील दुक्खा जाति पुन श्रुनं अर्थात पुन्हा पुन्हा जन्म दुःखकारक झाला हे शब्द शरीराच्या चार भौतिक घटकांच्या पुनर्जन्माकडे अंगुलीनिर्देश करीत नाहीत. ते स्पष्टपणे आत्मा वा जीव याने घेतलेल्या पुनर्जन्माचाच परोक्षपणे उल्लेख करतात. बुध्दत्व ही मानवी बुध्दिची सर्वाधिक अशी विकसित अवस्था आहे. ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या वेदनेच्या उपभोगाची इच्छाच शिल्लक राहात नाही. तृप्तता नकारात्मक इच्छेचा आधार असते. एखादे पक्वान्न यथेच्छ खाऊन तृप्त झाल्यानंतर तेच पक्वान्न पुन्हा त्या व्यक्तीसमोर आल्यास तो त्यास नकार दर्शवितो. येथे नकाराचे कारण त्या पक्वान्नाच्या दर्जा वा बहुलौतेशी संबंधीत नसून त्याने झालेल्या मानसिक तृप्तीशी संबंधीत असते. या प्रमाणेच विकसित होऊन जेंव्हा बुध्दत्व प्राप्त झाले तेंव्हा भगवान बुध्दाने अनात्मवाद स्वीकारला आणि अन्य चार घटकांचाच पुनर्जन्म होतो हे सांगितले. हा त्यांचा सिध्दांत शास्त्राधारीत आहे.

जतक कथातील बोधिसत्वाने जी बोधी प्राप्त केली त्याचा अंश एका पिढीकडून दुस–या पिढीकडे प्रवाहीत होत सिध्दार्थ गौतमापर्यंत आला आणि मग तो बुध्द झाला असा विचार जातक कथातील वैदिक सिध्दांतानुसार असणा–या पुनर्जन्म सिध्दांतास नाकारतांना दिला जातो. परंतु हा विचार निर्विवादपणे स्वीकारताच येत नाही. कारण हा बुध्दांश सिध्दार्थ गौतमाकडेच कसा काय प्रवाहीत झाला?त्या काळी काय तो एकटाच संवेदनशील बुध्दी असणारा व्यकती होता ?बोधिसत्वाने मानवेतर जन्मात प्राप्त केलेली बोधी वा बुध्दांश मानवाकडे कशी काय प्रवाहित केली ?पशू जन्मात प्राप्त केलेली बोधि त्याच पशुच्या पुढच्या पिढीकडे का प्रवाहित झाली नाही ?असे अनेक प्रश्न हा विचार स्वीकारण्यासाठी अडथळे निर्माण करतात. युक्तिवादासाठी एखादा विचार मांडणे आणि सत्याच्या शोधार्थ मांडणी करणे यात अंतर आहे. भगवान बुध्द आणि जातक कथेतील बोधिसत्व ह्या दोन भिन्न अवस्था आहेत हे जोपर्यंत विचारांच्या स्तरावर मान्य होणार नाही तोपर्यंत हा असा गोंधळ होणारच !

जातक कथात वैदिक पुनर्जन्म सिध्दांताच्या अनुसार का मांडणी आली आहे या प्रश्नाचे उत्तर आपणास त्याच्या विशयांचा विचार केल्यास लक्षांत येऊ शकते. जातक कथातून पुढील विषय सांगितलेले आढळतात. 1) कल्पित कथा, यात नीतिविषयक आणि वैराग्यपर कथांचा समावेश करता येईल. 2) अद्भूत कथा. यात काही प्राण्यांच्या गोष्टी आहेत तर काही परिकथा आहेत. 3) लहान कथानके, विनोदी गोष्टी, प्रहसने, 4) दीर्घकथा यात काही उपकथांचा समावेश होतो. 5) नीतिकथा 6) आध्यात्मिक कथा. या सार्व कथा समाजात पसरलेल्या लोककथा होत्या. यातील अनेक कथा तर अखिल भारतीय स्वरूपाच्या होत्या आणि

आहेतही.भगवान बुध्दाचा उदय आणि तयाच्या तत्वज्ञानाचा प्रभावी प्रसार झाल्यानंतर राजपुत्राचे विलासी असे आयुष्य जगलेला सिध्दार्थ गौतम फक्त सहा आठवडयाच्या तपाचरणाने बुध्द होऊ शकतो वा बुध्दत्वास प्राप्त करू शकतो ही बाब तत्कालीन सर्वसामान्यांना अविश्वसनीयच वाटत असणार यात शंकाच नाही. आपणास ज्याच्याबद्दल आवड आहे ती व्यक्ती कशी असामान्य आहे हे विषद करण्याची अहमहमिकाच त्याच्या अनुयायात सुरू होते. असे म्हणतात की, कोणत्याही विचारकाचा पराभव त्याचे अनुयायीच करीत असतात. अगदी याच तत्वाच्या अनुसार कालांतराने निर्माण झालेल्या बौध्द ग्रंथातही वेदिकांचा पुनर्जन्म आणि कर्मविषयक सिध्दांत यांची मांडणी झालेली आढळते. मिलिंद प्रश्न या ग्रंथातही हे दिसून येते. आणि महत्वाचे म्हणजे लोककथा म्हणून प्रारंभी प्रसारीत असणा–या ज्या कथा कालांतराने जातक या ग्रंथात समाविष्ट झाल्या आहेत त्यातही हे आढळते. कर्माच्या स्वरूपाप्रमाणे कर्ता पुनर्जन्म घेतो ही तत्कालीन लोकप्रिय अशी वैदिक सिध्दांताधारीत कल्पना या कथांमधून आढळते.

जतक कथा या लोककथा आहेत. जातक कथांच्या गाथा या भाशादृष्टया प्राचीन असून त्यावरील अर्थकथा या पालीतून सिंहलीत आणि परत सिंहलीतून पालीत अशा रूपांतरीत झालेल्या असल्याने अनेक ठिकाणी त्याचा गद्यभाग तुलनेने अलिकडील आहे हे लक्षांत येते. त्यात लंकेचा उल्लेख आहे. काही ठिकाणी गाथा आणि त्यावरील टिका यांचा मेळ बसत नाही. उदाहरणच सांगायचे झाले तर दरस्थ मघीलगद्य टिका लिहिणा–याला गाथांचा अर्थ समजलेला नाही. बिडावळत जातकातील गाथ व शीर्षक मांजराबद्दल आहे व अतीत कथा कोल्ह्याबद्दल आहे. याचा सरळ अर्थ असा की, गाथा या प्राचीन असून त्यावरील स्पष्टीकरणार्थ आलेली गद्य कथा ही नंतर जोडण्यात आलेली आहे.असे असले तरीही गाथांप्रमाणेच गद्यभागही शुंगपूर्वकाळातील आहे हे भारहूत आणि सांची येथील स्तुपांच्या भिंतीवरील कोरीव विचारांवरून आणि जातकांची नांवे तत्कालीन ब्राह्मी लिपीत कोरलेली आहेत त्यावरून सिध्द होते. जातकाचे प्राचीनत्व आपण निःपक्ष बुध्दिने मान्य केल्यावर त्यांचे बौध्दिकरण (Budhistired) करण्यांत आले आहे असे मान्य करणे धाडसाचे वाटेल, परंतु असत्य नाही.

भगवान बुध्दाने प्रतिपादन केलेले तत्वज्ञान वगळता नंतरच्या कालखंडात निर्माण झालेले जे बौध्द साहित्य आहे ते सांस्कृतिक अतिक्रमणाने प्रभावित झालेले आहे. मिलिंद प्रश्न, जातक, धम्मपद अट्ठकथा असे कांही ग्रंथ आहेत की ज्यात वैदिकांच्या सैध्दांतिक संकल्पनांचा आधार घेतला गेलेला आहे. विचक्षणपणे वाचन करतांना हे ठळकपणे जाणवते. भगवान बुध्दावरील श्रध्देमुळे या ग्रंथांना भगवन बुध्दाच्या तत्वज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न करणे हे कितपत योग्य आहे ? जातक हा ग्रंथ भगवान बुध्दाशी संबंधित करतांना त्यातील वैदिक संकल्पनांकडे दुर्लक्ष करता येत नाही. जातकाचा अभ्यास विचक्षपणे होणे आवश्यक आहे आणि त्यात झालेल्या सांस्कृतिक अतिक्रमणाची नोंद करून निखळ बौध्द तत्वज्ञानाशी संबंधित किती भाग आहे याचा शोध घेणे आज अत्यंत आवश्यक आहे.

***संदर्भ***

1.बृहदारण्य उपनिषद 4 / 4 / 3–4
2.महाभारत शांतिपर्व अध्याय 15.
3.मिलिंदपन्हपालि (हिंदी अनुवादासह) स्वामी न्दारिकावाशास्त्री पृ. 10–11.
4.मिलिंदप्रश्नःसदानंद स्थविर. पृ. 23
5.मिलिंदपन्हो : स्वामी द्वारिकादास शास्त्री. पृ. 82–83.
6.जातक प्रथम खंड, भदंत आनंदकौसल्यायन पृ. 11–12.
7.धम्मपद : जरावर्ग : 153.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net